# स्नेह समृध्दी मंडळ

# वार्षिक अहवाल – २०२४ -२५

# अनुक्रमणिका

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | प्रकल्प स्वयंसिध्दा |
| २ | प्रकल्प विद्या |
| ३ | प्रकल्प समर्था |
| ४ | प्रकल्प निरंतर |
| ५ | संस्था प्रतिनिधींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, अभ्यास वर्ग व विशेष बैठकांमध्ये सहभाग |
| ६ | संस्था भेटी |

# ‘‘स्वयंसिध्दा’



# प्रकल्प ‘स्वयंसिध्दा’ अंतर्गत महिलांच्या आधारगट बैठका

| बैठक गावाचे नाव | दिनांक | घेण्यात आलेले विषय |
|---|---|---|
| देवधामापूर | ०३/०४/२०२४ | गटाच्या मासिक बैठकीमध्ये आर्थिक देवाणघेवाणबाबत चर्चा करण्यात आली. |
| | ०३/०५/२०२४ | कर्ज देवघेव यावर येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. |
| | ०३/०६/२०२४ | गटाच्या विषयानंतर पाणीप्रश्न, पाणीपटटी, गटातील गैरसमज याबाबत चर्चा. |
| | ०७/०६/२०२४ | वाडीतील काही समस्यांबाबत बैठक होऊन त्यामध्ये सर्व सदस्यांना सहभाग होण्यासाठी चर्चा झाली. ग्रामपंचायतमध्ये आलेला पैसा आणि ग्रामस्थांनी भरलेले पैसे, पाणी बील यावर चर्चा होती. |
| | ०३/०८/२०२४ | पाच बचतगटांची मासिक बैठक आणि आधारगट बैठक. आभा कार्डबाबत मार्गदर्शन. |
| | ०३/०९/२०२४ | पाच बचतगटांची एकत्र बेठक. कर्जपरतफेड बाबत चर्चा झाली. |
| | ०३/०९/२०२४ | मुलींची सुरक्षितता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. |
| | ०३/१०/२०२४ | पाच महिला बचतगटांची एकत्र बैठक. थकीत कर्ज वसुलीबाबत चर्चा. |
| | १८/११/२०२४ | हिशेब सादर करण्यात आले. |
| | ०३/१२/२०२४ | पालक व मुलांमध्ये नाते कसे असावे यावर चर्चा व मार्गदर्शन. |
| | ०३/१२/२०२४ | हिशेब सादर करण्यात आले. |
| | [illegible] | [illegible] |

# महिलांच्या आधारगट बैठकांची क्षणचित्रे









# प्रकल्प 'स्वयंसिध्दा' अंतर्गत महिलांच्या आधरगट बैठका

| बैठक गावाचे नाव | दिनांक | घेण्यात आलेले विषय |
|---|---|---|
| मानसकोंड | १४/०४/२०२४ | हिंसाचारापासून संरक्षणाबाबत मार्गदर्शन. हिंसा होताना परस्परांना मदत कशी करावी यावर माहिती देण्यात आली. |
| | १४/०५/२०२४ | वाडीमध्ये राज भांडणं होतात त्यावर चर्चा व महिलांनी  या समस्येवर करावयाचा उपाय याबाबत मार्गदर्शन. मुलींच्या बैठकीला सर्व मुलींनी उपस्थित रहाण्याबाबत पालकांनी सहकार्य कसे करावे याबाबतही चर्चा झाली. |
| | १४/०६/२०२४ | महिलांना हिंसेचे प्रकार उदाहरणांसह सांगण्यात आले. |
| | १४/०८/२०२४ | युवतींच्या संधटनासाठी आधारगटाचा सहभाग महत्वाचा यावर चर्चा झाली. |
| | १९/०९/२०२४ | स्थानिक केसवर गटामध्ये चर्चा झाली. उपस्थिती १२ महिला. |
| | १४/१०/२०२४ | महिला आधारगट बैठक २४ महिला उपस्थिती होत्या. कायद्यांबाबत माहिती देण्यात आली. |
| | १४/११/२०२४ | ताण तणावाची कारणं आणि मार्ग यावर माहिती देण्यात आली. |
| उजगाव | २९/०६/२०२४ | कृष्णा फेपडे केस संबंधी गावातील प्रतिष्ठीत आणि नातेवाईक यांच्याबरोबर बैठक. |

# महिलांच्या आधारगट बैठकांची क्षणचित्रे







# स्नेह समृध्दी समुपदेशन केंद्र अहवाल

- संस्थेच्या समुपदेशन केंद्रामध्ये १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीमध्ये पुढीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात आले.

१) एकूण अर्ज दाखल करण्यात आले - २९

२) वैद्याकिय तपासणीकरीता पाठविण्यात आलेल्या केसेची संख्या - २

३) दाखले व इतर कागदपत्रांबाबत माहिती देणे व सहकार्य करणे - ५

४) पोलीस स्टेशनला नोंद करण्यात आले - २

५) कौटुंबिक हिंसेबाबत समुपदेशन, गृहभेटी आणि कुटुंबासह बैठका यामधून सोडविण्यात आलेल्या केसेस - २०.

# मनस्वी, सावली, प्रेरणाबचतगट अहवाल

| गटाचे नाव | सदस्य संख्या | अंदाजे उलाढाल | कर्जधारक | परतफेड | बँक कर्ज (CC) |
|---|---|---|---|---|---|
| प्रेरणा बचतगट | १४ | ३ लाख | १० | १०० टक्के | |
| सावली बचतगट | १६ | ३१ लाख | १३ | १०० टक्के | २ लाख |
| मनस्वी बचतगट | १६ | ४५ लाख | १४ | १०० टक्के | ७ लाख |

❖ **कर्जाची कारणे**

१) वाहन खरेदी
२) वाहन दुरुस्ती
३) घर दुरुस्ती
४) मुलांच्या विविध कोर्सेसच्या फी
५) मोठया कर्जाचा हप्ता भरणे
६) दागिने सोडविणे
७) वैद्याकिय खर्चाकरिता
८) इतर वैयक्तिक गरजांकरिता.

# देवरुख होम प्रॉडक्टस कंपनीचा अहवाल

| तपशिल | आर्थिक मोबदला रक्कम |
| --- | --- |
| **आर्थिक रोजगार** | |
| देवरुख होम प्रॉडक्ट्स कंपनी सन २०२४/२५ या कालावधीमध्ये सुमारे ७ महिलांना आर्थिक स्वरुपात रोजगार उपलब्ध करुन दिला. | १४५५५०/- |
| मजुरी :- मजुरी स्वरुपात एकूण ६ महिलांना आर्थिक स्वरुपात रोजगार उपलब्ध करुन दिला. (यामध्ये घरकाम, परिसर बाग, स्वच्छता इ. कामे) | ३२६००/- |
| शेतमाल खरेदी :- ग्रामीण भागातून महिला ३ बचतगट आणि महिला शेतकरी यांच्याकडून उत्पादने करण्यासाठी कच्चा माल खरेदी केला. (गावठी तांदुळ, गावठी हळद, गावठी नाचणी, गावठी कुळीथ आणि कैरी इ.) | ४००००/- |
| **एकूण १६ महिलांना देवरुख होम प्रॉडक्ट्स या कंपनीच्या माध्यमातून आर्थिक रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला.** | **२१८१५०/-** |
| **देवरुख होम प्रॉडक्ट्स विशेष :-**<br>**१)** सन २०२४/२५ मध्ये गणती उत्सवमधील काजू मोदकचे हे दुसरं वर्ष होतं. मागील वर्षीच्या ग्राहकांच्या उत्तम प्रतिसादामुळे यावर्षी देखील काजू मोदक विक्री मध्ये दुप्पटीने वाढ झाली. केवळ १५ दिवसांतच सुमारे रु.५०,०००/- एवढी विक्री झाली.<br>**२)** सन २०२४/२५ मध्ये दिवाळी फराळमध्ये यावर्षी L&T च्या प्रदर्शनामध्ये सहभाग नव्हता. तरीही स्थानिक तसेच इतर ठिकाणची विक्री सुमारे रु.१,००,०००/- एवढी झाली. विशेष म्हणजे यावर्षीचा फराळ कुरिअरने दिल्ली पर्यंत पाठविण्यात आला. तसेच चेन्नई, मुंबई, गुजरात, उत्तर प्रदेश या ठिकाणांहूनही फराळाच्या पदार्थांना मागणी होती त्याप्रमाणे फराळ पाठविण्यात आला. | |

# ‘विद्या’

# प्रकल्प “विद्या अंतर्गत शैक्षणिक आर्थिक सहाय्य करण्यात आलेले विद्यार्थी तपशिल

❖ सन २०२४/२५ मध्ये स्नेह समृध्दी मंडळ संस्थेच्या प्रकल्प “विद्या ” अंतर्गत एकूण ७७ विद्यार्थी-विद्यार्थिनींना रु.४,१९,३४२/- एवढी शैक्षणिक आर्थिक मदत करण्यात आली.

❖ पित्रे फाऊंडेशनच्या “विमलताई पित्रे सुकन्या योजना” मधून एकूण ६७ विद्यार्थ्यांना रु. ३,६०,०००/- एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य करण्यात आले.

❖ मा.श्री.प्रल्हाद व सुचिता परदेशी यांच्या मार्फत एकूण ३ विद्यार्थ्यांना रु. १५,०००/- एवढी रक्कम शैक्षणिक आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात आली.

❖ मा. श्रीमती सुवर्णा नंदकुमार प्रभुदेसाई यांच्या मार्फत या वर्षीही ३ विद्यार्थ्यांना रु. १२,०००/- एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य करण्यात आले.

❖ मा. श्री. अवधूत नंदकुमार प्रभुदेसाई यांनी एका गरजू विद्यार्थ्याला रु. ६०००/- एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य केले.

❖ मा. श्री. चंद्रहास शिंदे यांनी रु.६५००/- एवढी रक्कम एका विद्यार्थ्याला देणगी स्वरुपात दिली.

❖ मा. श्रीमती धनश्री माधव हळबे यांच्यामार्फत मागील दोन वर्षांप्रमाणेच यावर्षीही रु.१९,८०७/- एवढी शैक्षणिक आर्थिक मदत एकूण ३ विद्यार्थ्यांना करण्यात आली आहे.

❖ अशा प्रकारे संस्थेचा प्रकल्प विद्या अंतर्गत कार्यक्षेत्रातील गरजु व होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक मदत करण्याचे काम गेली आठ वर्षे सुरु आहे.

# प्रकल्प ‘विद्या’ अंतर्गत गृहभेटीची काही क्षणचित्रे









**पालक, शिक्षक व विद्यार्थी यांना प्रकल्प ‘विद्या’ विषयक माहिती देवुन विद्यार्थ्यांचे फॉर्म भरुन घेताना संस्था कार्यकर्त्या नयन शिंदे**



# प्रकल्प ‘विद्या’ अंतर्गत धनादेश वितरण



जि.प.शाळा आंबवली नं.२



जि.प.शाळा कानसकोंड



बुरंबी हायस्कुल



मानसकोंड



वांझोळे हायस्कुल

# प्रकल्प ‘विद्या’ अंतर्गत धनादेश वितरण

देवधामापूर



कोसुंब



तळवडे



वांझोळे



# ‘विद्यार्थ्यांशी संवाद’ प्रकल्प विद्या अंतर्गत विशेष कार्यक्रम

दिनांक १४ जुलै २०२४ रोजी स्नेह समृध्दी मंडळ या सामाजिक संस्थेने देवरुख येथे तालुक्यातील निवडक विद्यार्थी व पालकांना एकत्र निमंत्रित केलं होतं. शिक्षण विभाग पंचायत समिती देवरुख, पित्रे फाऊंडेशन मुंबई चे अध्यक्ष मा.अजयजी पित्रे, सहाय्यक मा.विजयजी विरकर, स्नेह समृध्दी संस्थेचे संस्थापक मा.श्री.रामचंद्र देशपांडे सर, स्नेह समृध्दी मंडळच्या अध्यक्षा मा.श्रध्दा देशपांडे, संस्थेचे ट्रस्टी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. पाऊस, एस.टी.ची विस्कळीत सेवा असे असुनही १५५ व्यक्ती या कार्यक्रमाला उपस्थित होते.






## ‘युवती संरक्षण’ कार्यक्रम अंतर्गत मार्गदर्शन करताना संस्था प्रतिनिधी नयन शिंदे


संस्थेच्या कार्यक्षेत्रातील छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यामंदिर कोसुंब येथील इयत्ता ५ वी ते १० वीच्या सर्व मुला-मुलींना शासनाच्या आदेशाप्रमाणे ‘विद्यार्थी सुरक्षा समिती’ आणि ‘सखी सावित्री समिती ‘ची स्थापना करण्यात आली. स्नेह समृध्दी मंडळ संस्था करीत असलेल्या अशाच प्रयत्नांमुळे या समितींवर सदस्य म्हणून संस्थेच्या अनुभवी आणि वरीष्ठ कार्यकर्त्या सौ.नयन शिंदे यांची नेमणुक करण्यात आली. यावेळी नयन शिंदे यांनी पोक्सो २०१२ चा कायदा, त्यामधील तरतुदी, शिक्षेचे स्वरुप इ.बाबत उदाहरणांसह माहिती दिली. त्याचबरोबर शाळा सतित्यांची गरज आणि महत्व याबददल मार्गदर्शन करण्यात आले.






# मांजरेकर फाऊंडेशन पूणे, यांच्या मार्फत संस्थेच्या पुढाकाराने व पित्रे फाऊंडेशनच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक सहाय्य प्राप्त झाले

मांजरेकर फाऊंडेशन पूणे यांच्यामार्फत शैक्षणिक सहाय्यासाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना पूणे या ठिकाणी जावे लागणार होते. मात्र पित्रे फाऊंडेशनचे मा.विरकर सर यांच्या मध्यस्थीने मुलांची मुलाखत ऑनलाईनच्या माध्यमातून संस्थेच्या कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली. झूम मिटींग दËवारे घेण्यात आलेल्या मुलाखतीनंतर मांजरेकर फाऊंडेशनच्या मा.श्रीमती मांजरेकर मॅडम यांनी सर्व विद्यार्थ्यांशी बोलून त्यांना त्या मागणीपेक्षा जास्त म्हणजे तीन विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.१०,०००/- आणि एका विद्यार्थ्याला रु.११,०००/- मंजुर करण्यात आले. तसेच उत्तम शैक्षणिक प्रगती करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाचीही मदत करण्यात येईल असे मांजरेकर मॅडम यांनी आश्वासन दिले.





# ''समथी''

# प्रकल्प 'समर्था' अंतर्गत युवतींच्या बैठका

| बैठक गावाचे नाव - देवधामापूर | |
|---|---|
| **दिनांक** | **घेण्यात आलेले विषय** |
| ०५/०४/२०२४ | घरच्या उपलब्ध साहित्यामधुन वेगवेगळे पदार्थ करणे तसेच स्वच्छता ठेवणे त्यामुळे आरोग्याची पण काळजी घेतली जाते याबाबत मार्गदर्शन. |
| ०७/०४/२०२५ | दैनंदिन वर्तणुक यावर पालक आणि मुली यांच्यामध्ये सुसंवाद कसा असावा यावर चर्चा. याबाबत मुलींच्या आईची मतं चर्चेत घेतली गेली. |
| २६/०४/२०२४ | पाणीपुरी प्रशिक्षण देण्यात आले. हॉटेलचे पदार्थ कमी खर्चात घरच्या घरी तयार करण्यातील फायदे यावर माहिती देण्यात आली. |
| २०/०५/२०२४ | मुली व आई अशी बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये होणारे विषय तयांची आवश्यकता यावर मार्गदर्शन. पालकांनी मुलींना बैठकीला पाठविण्याची गरज का आहे हे सांगण्यात आले. |
| २२/०६/२०२४ | युवतींशी अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. |
| ०७/०७/२०२४ | पाणी पुरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. |
| २७/०८/२०२४ | शाळेमध्ये दहीहंडी कार्यक्रमामध्ये सहभाग आणि महिला बैठकीचे ४ तारखेचे नियोजन झाले. |
| १२/११/२०२४ | स्वसंरक्षणबाबत लेखी माहितीवरुन चर्चा झाली. |
| १७/११/२०२४ | पाष्टेवाडी युवतीगटाचे बटाटावडा प्रशिक्षण घेण्यात आले. |
| ०८/१२/२०२४ | पालक व मुलं यांच्या जबाबदाऱ्या याबाबत चर्चा व मार्गदर्शन. |

# युवतींच्या बैठकांची काही क्षणचित्रे









देवधामापूर

# प्रकल्प 'समर्था' अंतर्गत युवतींच्या बैठका

| बैठक गावाचे नाव - कानरकोंड | |
|---|---|
| **दिनांक** | **घेण्यात आलेले विषय** |
| १३/०४/२०२४ | युवती गटाला मिसळ पावचे प्रशिक्षण देण्यात आले. १९ मुली हजर होत्या. |
| १७/०६/२०२४ | शैक्षणिक बाबत मार्गदर्शन व पदार्थ प्रशिक्षणाबाबत चर्चा |
| २०/०७/२०२४ | मुली व पालकांसमवेत बैठक घेण्यात आली. कांदाभजी प्रशिक्षण याबाबत पालकांचे मत समजुन घेण्यात आले. |
| १९/०८/२०२४ | मुलींची बैठक व धनादेश वितरण कार्यक्रमाबदËदल उपस्थित मुलींसमवेत पुढील नियोजन झाले. |
| २८/०९/२०२४ | पालक व मुली अशी बैठक घेण्यात आली. संघटनाचे महत्व व आधारगट महत्व हे विषय घेण्यात आले. |
| १६/११/२०२४ | पाणीपुरी प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात आले. |
| १४/१२/२०२४ | सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नियोजनावर चर्चा. |
| २१/१२/२०२५ | सांस्कृतिक कार्यक्रम झाले. विविध खेळ यामध्ये घेण्यात आले. |

# युवतींच्या बैठकांची काही क्षणचित्रे










कानरकों

# प्रकल्प ‘समर्था’ अंतर्गत युवतींच्या बैठका

| बैठक गावाचे नाव - मानसकोंड | |
|---|---|
| **दिनांक** | **घेण्यात आलेले विषय** |
| १८/०४/२०२४ | घरी हॉटेलसारखे सोपे पदार्थ करु शकतात. त्यामध्ये स्वच्छता आणि कमी खर्च असून शरीराला सुध्दा हानीकारक नाही यावर मार्गदर्शन करण्यात आले. |
| ०१/०५/२०२४ | कमी खर्चामध्ये चटपटीत हॉटलसारखे पदार्थ बनविणे यावर माहिती देण्यात आली. ओली भेळ कशी बनवायची याचे प्रशिक्षण देण्यात आले. |
| १२/०६/२०२४ | शैक्षणिक सहाय्य प्रकल्पाबाबत माहिती फॉर्म भरुन घेण्यात आले. पुढील बैठकीला प्रशिक्षण घेण्याचे ठरले. |
| ०६/०७/२०२४ | कांदा भजी प्रात्यक्षिक कार्यक्रम घेण्यात आला. २६ मुली उपस्थित होत्या. |
| ०४/०८/२०२४ | विद्यार्थी व पित्रे साहेब यांच्यामध्ये झालेल्या कार्यक्रमाबाबत चर्चा. |
| ०९/११/२०२४ | मोबाईल वापरताना काय मेसेज वाचावेत, आपली स्वत:ची सुरक्षा कशी करावी, चांगले काय वाईट काय त्याच्या परिणामांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. |
| ०१/१२/२०२४ | वयात येताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन. |

# युवतींच्या बैठकांची काही क्षणचित्रे











मानसकोंड

# प्रकल्प 'समर्था' अंतर्गत युवतींच्या बैठका

| बैठक गावाचे नाव - तळवडे | |
|---|---|
| दिनांक | घेण्यात आलेले विषय |
| २४/०६/२०२४ | गटाचे व संघटनाचे महत्व तसेच शैक्षणिक प्रकल्पाबाबत माहिती देण्यात आली. |
| १७/०७/२०२४ | मुली व त्यांचे पालक यांच्यासोबत बैठक घेण्यात आली. संस्थेची मुलींसोबत काम करण्याच्या पध्दतीबदËदल माहिती सांगण्यात आली. |
| ११/०८/२०२४ | युवतीगटाची बैठक आणि तळवडे जि.प.शाळेमध्ये पर्यावरणबाबत मागदर्शन. |
| २२/०९/२०२४ | सर्व मुलींनी उपस्थित रहाण्याबाबत चर्चा झाली. पुढील बैठकीला पदार्थ पशिक्षण ठरले. |
| ०६/१०/२०२४ | मुलींची उपस्थिती कमी होती त्याबाबत चर्चा. पुढील बैठकीला प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याचे ठरले. (ओली भेळ) |
| १३/१०/२०२४ | युवती गटातील मुलींचे भेळ प्रशिक्षण घेण्यात आले. |
| २३/११/२०२४ | युवतीगटाचे पाणीपुरी प्रशिक्षण घेण्यात आले. |

# युवतींच्या बैठकांची काही क्षणचित्रे









तळवडे

# प्रकल्प ‘समर्था’ अंतर्गत युवतींच्या बैठका



**बैठक गावाचे नाव - आंबवली**

| दिनांक | घेण्यात आलेले विषय |
|---|---|
| १८/०५/२०२४ | नवीन युवतीगट स्थापनेसंबंधी मुलींची बैठक. गटाचे महत्व आणि गरज यावर मार्गदर्शन करण्यात आले. |
| २९/०५/२०२४ | स्वागत व समारोप याबाबत युवतीगटात मार्गदर्शन आणि शैक्षणिक प्रकल्पाबाबत मुलींचे सर्वेक्षण. |
| २१/०७/२०२४ | पालक व युवती गट बैठक. १४ तारखेच्या कार्यक्रमाबाबत चर्चा. गटांचे महत्व व गरज याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. |
| १६/०६/२०२४ | मुलींचे वर्तन यासंबंधी माहिती देण्यात आली. वैयक्तिक संपर्क – बंडबे यांच्याशी त्यांच्या मुलींचे शिक्षण व इतर व्यवस्था वसतिगृहात होईल का यावर चर्चा झाली. आई नसल्यामुळे मुली सुरक्षित राहतील हा उदËदेश होता. |
| २४/०८/२०२४ | आंबवली व कानरकोंड गावातील मुलींना शैक्षणिक सहाय्य निधीचे धनादेश वितरण कार्यक्रम स्थानिक |

# संस्थेला विशेष भेट

प्रेरणा संस्था मुंबई, आश्विनी कांबळे यांनी संस्थेला भेट दिली. या बैठकीमध्ये प्रेरणा संस्थेच्या मुलींच्या संदर्भातील पोक्सो कायद्याबाबतच्या कार्यक्रमासंबंधी चर्चा करणेत आली



**IDBI Bank Devrukh शाखेचे व्यवस्थापक मा.श्री.प्रतिक मनवानी आणि देवरुख मधील प्रसिध्द सोने व्यापारी श्री.सिध्दी ज्वलर्सचे मालक आणि आपल्या शैक्षणिक प्रकल्पाचे देणगीदार मा.श्री.भुपेश पंडित यांनी संस्थेला सदिच्छा भेट दिली.**



**संस्थेच्या कार्यालयामध्ये श्री.महेश घोसाळकर प्रयास प्रजोक्ट, टाटा इन्टीटयुट ऑफ सोशल सायन्स, सोशल वर्क कॉलेज, मुंबई यांनी संस्थेला भेट दिली.**



# संस्था प्रतिनिधींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, अभ्यासवर्ग व विशेष बैठकांमध्ये सहभाग

# संस्था प्रतिनिधीचा इतर कार्यक्रमामध्ये सहभाग

- दि. १९/०४/२०२४ कानरकोंड येथे सांस्कृतिक कार्यक्रम हळदीकुंकू यासाठी महिलांमध्ये सुनिता माईन यांनी
  सहभाग घेतला.
- दि. २५/०५/२०२४ ताम्हाने या ठिकाणी ग्रामसंघाच्या बैठकीला संस्था पितिनिधी सुनिता माईन यांनी उपस्थित राहून मुलींच्या संघटनाबाबत विषय मांडणी करण्यात आली.
- दि. २०/०४/२०२४ धामणी या ठिकाणी बचतगटांच्या मागणीनुसार सुनिता माईन यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात आले. संस्थेच्या कार्यक्रमांबाबत माहिती देण्यात आली.
- वाशिष्टी दुग्ध व्यवसाय चिपळूण येथे प्रकल्प पहाण्यासाठी सीआरपीं सह कार्यक्षेत्रातील महिलांचा सहभाग.
- दि. २७/०९/२०२४ रोजी 'उमेद' आयोजित महिला मेळाव्यामध्ये सहभाग. गटांचे आर्थिक व्यवहार आणि २००५ च्या कायद्याबाबत मार्गदर्शन संस्थेच्या कार्यकर्ता सुनिता माईन माईन यांनी केले.
- महिला दक्षता कमिटी बैठकीला पोलीस स्टेशनला उपस्थिती – नयन शिंदे

# जि.प.शाळा तळवडे पर्यावरणबाबत मार्गदर्शन करताना संस्था प्रतिनिधी मा.सुनिता माईन



कोसुंब हायस्कुल व बेलारी हायस्कुल मधील ‘सखी सावित्री’ समितीवर संस्थेची निवड करण्यात आली असल्याने ५वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुला-मुलींसाठी पोक्सो कायदा २०१२ बाबत व समितीची गरज व महत्व याबाबत मार्गदर्शन






**आठल्ये सप्रे महाविद्यालय देवरुख या ठिकाणी संस्थेला 'मुलींच्या विविध प्रतिमा' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. यावेळी संस्थेच्या प्रतिनिधी मा.नयन शिंदे यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून अतिशय महत्वाचे मार्गदर्शन केले.**






## वाशी तर्फे संगमेश्वर हायस्कुलमध्ये स्नेह समृध्दी संस्थेच्या शैक्षणिक विषयात केलेल्या सहकार्याबददल मा.आमदार शेखरजी निकम यांच्या हस्ते संस्थेचा गौरव करण्यात आला तो स्वीकारताना संस्थेच्या प्रतिनिधी सौ.नयन शिंदे



रेन्टि० फाऊंडेशन यांनी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये संस्थेचा सहभाग. संस्थेच्या कामाची ओळख करुन देणे आणि देवरुख परिसरामध्ये विविध क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचे काम समजुन घेऊन निसर्ग वाचविण्यासाठी आपल्या कार्यक्रमांमध्ये सहभागी करुन घेणे असा उदËदेश या बैठकीचा होता.



**रेडिओ विश्वास 90.8 CR कम्युनिटी रेडिओ अव्हेरनेस वर्कशॉप मध्ये संस्थेचे संस्था प्रतिनिधी म्हणून संस्थेचे संस्थापक व मार्गदर्शन मा.श्री.रामचंद्र देशपांडे सर**








डॉ. हरी कुलकर्णी ,
स्टेशन डायरेक्टर,
रेडिओ विश्वास,
नाशिक.





**मा.श्री.रामचंद्र देशपांडे,संस्थे चे संस्थापक व मार्गदर्शक**

# सेवावर्धिनी संस्था पूणे, ऑनलाईन बैठकांमध्ये संस्था प्रतिनिधींचा सहभाग




सत्राचा विषय – प्रभाव मुल्यांकन (इम्पॅक्ट असेसमेंट)
सहभाग – श्रावणी काबदुले




सत्राचा विषय – सी.एस.आर. निधी व्यवस्थापन
सहभाग – मा.श्रध्दा देशपांडे व श्रावणी काबदुले

# संस्थेच्या अध्यक्षा मा.श्रध्दा देशपांडे यांचा प्रेरणा संस्था मुंबई, यांच्यामार्फत बाल संरक्षण बाबत कार्यक्रम रत्नागिरी येथे सहभाग



# ‘जनसुनावणी’ कार्यक्रम, रत्नागिरी या कार्यक्रमासाठी संस्था प्रतिनिधी समुपदेशक सुनिता माईन समुपदेशन केंद्रामधील तीन केसेस सह उपस्थित






# ८ मार्च महिला दिन निमीत्त बेटी बचाओ, बेटी पढाओ रॅलीमध्ये संस्थेच्या कार्यकर्त्या मा.नयन शिंदे यांचा सहभाग



# मराठी भाषा संवर्धन दिना निमीत्त कोसुंब हायस्कुल येथे बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा बाबत मार्गदर्शन शिबीर मध्ये मा.नयन शिंदे यांचा सहभाग व मार्गदर्शन






## पंचायत समिती संगमेश्वर, देवरुख महिला बालकल्याण विभागमध्ये पंचायत महिला शक्ती अंतर्गत महिला मेळाव्यामध्ये संस्था व समुपदेशन केंद्रामध्ये असलेल्या सेवा याबाबत मार्गदर्शन – मा. नयन शिंदे






# संस्थेचा इतर शासकीय यंत्रणांशी कार्यालयीन कामकाजासंबंधी संपर्क

१) सहयोग महिला फेडरेशनच्या लेबर कॉन्टॅÒक्ट ऑफिस रत्नागिरी, प्रोफेशन टॅक्स, जी.एस.टी., एम.एल.डब्लू.बी., ई.एस.आय.सी.ऑफिस रत्नागिरी व मुंबई या सर्व सरकारी कार्यालयांशी रजिस्टेÒर्शन्स रद्द करणेसंदर्भात संपर्क – श्रावणी काबदुले.

२) स्नेह समृध्दी मंडळ संस्थेचा सन २०२१ ते २०२४ व सन २०२४ ते २०२७ पर्यंतचा (२) चेंज रिपोर्ट धर्मादाय कार्यालय रत्नागिरी यांच्याकडे सादर करण्यात आला – नयन शिंदे.

३) पोलीस स्टेशन देवरुख, केस संबंधी कामकाज, जवाब घेणे इ – नयन शिंदे.

४) संस्थेच्या चेंज रिपोर्ट संबंधी कामकाज – रजिस्टर अपडेट करणे, धर्मादाय आयुक्तांनी दिलेल्या सुचनेनुसार अर्ज तयार करुन धर्मादाय आयुक्त कार्यालय रत्नागिरी येथे सादर करणे – नयन शिंदे.

५) सहयोग ऑडिट रिपोर्ट धर्मादाय आयुक्त रत्नागिरी यांना नयन शिंदे यांनी सादर केला.

# धन्यवाद